नि.फौ.ख.क्रं.५८/२०१८
शासन वि काशिनाथ
नि.क्रं. ८५

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं. ५ यांची शपथेवर जबानी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | मुदस्सर अरिफ शेख |
| वय | : | ४५ वर्षे |
| व्यवसाय | : | नोकरी |
| राहणार | : | उपविभागीय पोलीस कार्यालय आष्टी, ता. आष्टी जि. बीड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत**

१. मी २०१७ साली पोलीस नाईक म्हणून आष्टी पोलिस स्टेशन ला नेमणूकीस होतो. वरिष्ठांच्या आदेशाने गु.र नं. ३७४/२०१७ कलम ३२६ भादवी प्रमाणे गुन्हा तपास माझेकडे आला. मी फिर्याद, प्रथम खबर अहवालचे अवलोकन केले. जखमी जबाब देण्याच्या परिस्थितीमध्ये असलेबाबत वैद्यकीय अधिकारी नोबेल हॉस्पीटल यांना पत्र दिले. साक्षीदारास ते पत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पत्रास **नि. ८६/पी.डब्ल्यु. ५** देण्यात येते. वैद्यकीय अधिकारी यांनी फिर्यादी जबाब देण्याच्या परिस्थितीमध्ये नसलेबाबत सांगितले.

२. दोन पंचासमक्ष मी घटनास्थळ पंचनामा केला. त्यावर माझी व दोन पंचाची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **नि. ८७/पी.डब्ल्यु. ५** देण्यात येते. साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. नोबेल हॉस्पीटल वैद्यकीय अधिकारी यांना पुन्हा जखमीचे जबाब नोंदविणेकामी पत्र दिले. साक्षीदारास ते पत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पत्रास **नि. ८८/पी.डब्ल्यु. ५** देण्यात येते. डॉक्टरांनी रुग्ण जबाब देण्याच्या परिस्थितीत असलेबाबत सांगितले. त्यानंतर जखमी झुंबर जगताप यांचा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले.

३. आरोपींना अटक केली. त्यानंतर कलम २७ प्रमाणे निवेदन पंचनामा केला. सदर पंचनामा साक्षीदारास दाखवण्यात आला. त्यावर माझी, आरोपी काशिनाथ व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. निवेदन पंचनाम्यास **नि. ८९/पी.डब्ल्यु. ५** देण्यात येते. त्यानंतर आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व काठ्या जप्त केली. त्यानंतर त्याबाबत जप्ती पंचनामा केला. सदर पंचनामा साक्षीदारास दाखवण्यात आला. त्यावर माझी, आरोपी काशिनाथ व दोन पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्ती पंचनाम्यास **नि. ९०/पी.डब्ल्यु.**

५ देण्यात येते. साक्षीदारास मुद्देमाल आर्टीकल अ,ब,क (एम.ओ. १ ते ३) दाखवला. साक्षीदाराने सदर ३ काठ्या त्याच असल्याचे ओळखले. मुद्देमालावरील लेबलवर माझी व दोन पंचाची सही आहे.

४. आरोपींना न्यायालयात हजर केले. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी वैद्यकीय अधिकारी नोबेल हॉस्पीटल यांना पत्र दिले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पत्रास **नि. ९१/पी.डब्ल्यु. ५** देण्यात येते. डॉक्टरांनी मला सही करुन वैद्यकीय प्रमाणपत्र दिले. आरोपी विरुध्द तपासाअंती गुन्हा निष्पन्न झाला. आरोपीचे विरुध्द सबळ पुरावे मिळून आलेने त्यांचे विरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीस पाहिलेस ओळखू शकतो. आरोपी क्र. १, ३ व ४ हजर आहेत. नि. ८२ वरील आदेशान्वये आरोपी क्र. २ ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर. दोषारोपत्र दाखल करतेवेळी वैद्यकीय प्रमाणपत्रावर डॉक्टरांची सही होती.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. आर.आर. हंबर्डे यांचे मार्फेत उलटतपास**

५. मला तपासाबाबत बऱ्याच गुन्ह्यातील अनुभव आहे. हे म्हणणे खरे आहे की, खबर असल्याशिवाय वैद्यकीय अधिकारी प्रमाणपत्र देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी जखमी इसम नाही. जखमी झुंबर याची ते दवाखान्यात आलेबाबत आष्टी वैद्यकीय अधिकारी यांनी दि. ०९/१०/२०१७ माहिती दिली. मी सदर घटनेबाबत दि. ०९/१०/२०१७ ते १२/१०/२०१७ पर्यंत कोणतीही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गंभीर गुन्ह्यात आम्हाला स्वतः फिर्याद देण्याचा अधिकार आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार देखील फिर्याद देऊ शकतो. नि. ८६ वरील पत्रावर वरिष्ठांची सही व आवक–जावक क्रमांक नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुसऱ्या जिल्ह्यात जायचे असेल तर वरिष्ठांची व मा. पोलीस अधिक्षकांची परवानगी घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, दोषारोपपत्रात परवानगी घेतलेबाबत कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि. ८६ वरील पत्रावर वैद्यकीय अधिकारी यांची सही नाही. त्या पत्रावर for म्हणुन कारकुनाची सही दिसते.

६. साक्षीदारास नि. ४५ फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर दि. १२/१०/२०१७ नमुद असुन १२ अंकात खाडाखोड असल्याचे दिसुन येते. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल काठ्यांमध्ये कुऱ्हाडीचा दांडा नाही. तपासामध्ये दगड जप्त नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल काठ्याची जाडी, लांबी व रुंदी फिर्यादमध्ये नमुद नाही. दि. ०९/१०/२०१७ रोजीचे वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय आष्टी यांच्या सहीचे पत्र साक्षीदारास दाखवले. सदर पत्रावर माझी सही

नाही. पत्र मुळ असल्याने त्यास **नि. ९२** देण्यात येते. सदर पत्र मला ०९/१०/२०१७ रोजी प्राप्त झाले. हे म्हणणे खरे आहे की, आष्टीवरुन नगरला गेलेबाबत कागदोपत्री पुरावा दोषारोपपत्रात दाखल नाही. दि. ०९/१०/२०१७ ते १२/१०/२०१७ दरम्यान साक्षीदारांची चौकशी व जबाब नोंदवले नाही. जखमी झुंबर यांचा जबाब हॉस्पीटलमध्ये नोंदवला. नोबेल हॉस्पीटलमार्फत जखमी झुंबर त्यांच्याकडे उपचार घेत असलेबाबत पुरावा त्यांच्याकडुन मिळाला नाही.

**साक्षीदाराच्या विनंतीवरुन उलटतपास थोड्या काळासाठी तहकुब.**

७. नोबेल हॉस्पीटलच्या हद्दीमध्ये कोतवाली पोलीस स्टेशन १ कि.मी. अंतरावर आहे. माझे बीट तवलवाडी असल्याने परिसरातील लोकांशी परिचय आहे. साक्षीदार झुंबर यांचा जबाब दवाखान्यात नोंदवलेबाबत त्यावर डॉक्टरांची सही अथवा शेरा नाही. सदर जबाबमध्ये साक्षीदार झुंबर कोणत्या वॉर्डमध्ये दाखल, कोणत्या वैद्यकीय अधिकारीकडे उपचार घेत असलेबाबत नमुद नाही. झुंबर भाजप पक्षाचे तालुका अध्यक्ष राहिलेबाबत माहिती नाही. फिर्यादी व आरोपी कोणत्या गटाचे आहेत याबाबत तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जखमी झुंबर याचा तवलवाडी ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये स्वतंत्र पॅनल होता. आष्टी ते तवलवाडी ६–७ कि.मी अंतर आहे. तवलवाडीवरुन उपचारकामी सरकारी दवाखान्यात जाण्यासाठी मुख्य रस्ता पोलीस स्टेशन आष्टी समोरुन आहे. घटनेच्यावेळी तवलवाडी रस्ता कच्चा होता व रस्त्याचे काम चालु होते. रस्ता अरुंद असुन आजुबाजुला दगड पडलेले होते. तवलवाडीचे लोक आष्टीला कामासाठी येतात. घटनेच्यावेळेस रस्त्यावर पथदिवे नव्हते. घटनेच्यावेळी दिवस ६.०० ते ६.१५ पर्यंत मावळतो. घटना अंधाराच्या वेळेस घडली.

८. मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच आजुबाजुचे शेतवस्तीवरील लोकांचे जबाब नोंदवले नाही. गुन्ह्याचा तपास केलेबाबत स्टेशन डायरीला नोंद घ्यावी लागते. पोलीस स्टेशनला वाहनाचे ये–जा करण्यासाठी लॉगबुक असते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीस कलम २७ चा पंचनामा करणेसाठी घेऊन गेलेबाबत लॉगबुकला नोंद असल्याचा पुरावा दोषारोपपत्रात नाही. पोलीस स्टेशनला हालचाल रजिस्टर असते. आरोपी अटकेत असतांना तवलवाडीला नेलेबाबत कागदोपत्री पुरावा दोषारोपपत्रात नाही. तपासकामी फिर्यादी व जखमींचे कपडे जप्त केले नाही. गुन्ह्यातील मोटारसायकलच्या मालकांचे जबाब नोंदवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मोटारसायकल आरोपींच्या मालकीच्या नाहीत. फिर्यादीस वाहन चालक परवाना असलेबाबत तपास केला नाही. अमान्य की, आरोपींना वाहन चालवता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी घटना घडलेबाबत खाना–खुन नव्हती. जखमी झुंबर यास साखरचा आजार असलेबाबत माहिती नाही.

जखमी झुंबर कधी शुध्दीवर आला त्याबाबत वैयक्तीक चौकशी केली नाही. मुद्देमाल काठ्या आरोपींच्या असलेबाबत त्यावर खाणाखुन नाही. मुद्देमाल सहज बाजारात उपलब्ध होऊ शकत नाही. मुद्देमाल शेतकऱ्यांकडे सहज उपलब्ध होतो. फिर्यादमध्ये मोटारसायकलचे वर्णन नमुद नाही.

९. पंचनाम्यात मनोहर तवले यांची शेती आहे त्याबाबत व्यक्तीगत चौकशी केली नाही. घटनास्थळ कोणत्या सव्र्हे नंबर मध्ये आहे त्याबाबत दोषारोपत्रात पुरावा दाखल नाही. अमान्य की, जप्ती पंचनामा बेकायदेशीर आहे. साक्षीदारांनी जप्त मुद्देमालाचे वर्णन सांगितले नाही. जप्त मुद्देमाल काठ्याने त्यांना मारहाण झालेबाबत साक्षीदारांचे पुरवणी जबाब नोंदवले नाही व ते त्यांना दाखवले नाही. जप्त मुद्देमालाची स्टेशन डायरीला नोंद असलेबाबत सांगता येत नाही. फिर्यादमध्ये फिर्याद उशिराने दाखल केल्याचे कारण नोंदवल्याचे दिसत नाही. फिर्याद ४ दिवस उशिराने दाखल केल्याचे दिसते. त्याबाबत तपास केला नाही. घटनास्थळ वर्दळीचे ठिकाण आहे. अमान्य की, घटनास्थळावर वळणाचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनासथळाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुने ८–९ फुटाचे चारी खांदली आहे. घटनेच्यावेळेस दोन्ही बाजुने खडीचे ढिगारे पडलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाजवळ अभिषेक याची शेती आहे. घटनास्थळाच्या पश्चिमेस फिर्यादीचे घर आहे. घटनास्थळावरील गोठ्याची स्वतंत्र चौकशी केली नाही. कलम २७ पंचनाम्यामध्ये गोठ्याच्या चतुःसिमा नमुद नाहीत. तसेच गोठा कोणाच्या मालकीचा आहे त्याचा तपास केला नाही.

१०. कलम २७ पंचनामा करुन पोलीस स्टेशनला येण्यासाठी १० मिनीटे वेळ लागला. येतांना सर्व आरोपी सोबत नव्हते. रिमांड यादी मी टाईप केली. सर्व नोंदी घेण्यासाठी ५ मिनीटे लागले. रिमांड बनवण्यासाठी १५ मिनीटे लागले. न्यायलयात ५ मिनीटांनी हजर केले. अमान्य की, फिर्यादीशी संगनमत करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले.

**न्यायालयाची वेळ संपल्याने उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

दि. १७.०४.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH
Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.04.21 17:29:41 +0530

श्री.एम.आर.बडाख

३ रे न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, आष्टी

नि.फौ.ख.क्रं.५८/२०१८
शासन वि काशिनाथ
नि.क्रं. ८५

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रं. ५ मुदस्सर अरिफ शेख यांचा आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. आर.आर. हंबर्डे यांचे मार्फेत उर्वरित उलटतपास शपथेवर सुरु –</u>**

११. हे म्हणणे खरे आहे की, ज्या शब्दात शिवीगाळ केली त्याबाबत तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व साक्षीदार यांना धमकावल्याबाबत वेगळा तपास केला नाही. अमान्य की, घटनास्थळाचे फोटो अथवा व्हीडीओ घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याची प्रत आरोपीस दिली नाही. अमान्य की, मुद्देमाला बाबत पुरवणी जबाब नोंदवावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, संपुर्ण तपासाची केस डायरी दोषारोप पत्रामध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, क्ष-किरण तसेच सी.टी. स्कॅन अहवाला जोडलेला नाही. अमान्य की, वैद्यकीय प्रमाणपत्रावर सही नाही. त्यावर असणारी सही कोणाची आहे हे सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि. ९१ वरील पत्र दिल्यानंतर दि. २४/१०/२०१७ रोजी वैद्यकीय प्रमाणपत्र दिले नाही. अमान्य की, घटनास्थळ नि. ८७ वरील चतुःसिमा फिर्यादीच्या सांगण्यावरुन लिहिल्या.

१२. हे म्हणणे खरे आहे की, जखमी झुंबर याचे जबाब घेण्यासाठी मी दवाखान्यात गेलो होतो. साक्षीदार क्र. २ राहुल याचा जबाब पोलीस स्टेशनला नोंदवला. अमान्य की, नि. ९१ वरील पत्र नोबेल हॉस्पीटलला दिले नाही. दवाखान्यात गेलो तेव्हा साक्षीदार क्र. ३ झुंबर सोबत एक नातेवाईक होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे १६१ च्या जबाबात मोबाईल नंबर लिहिलेला नाही. फिर्यादी व साक्षीदार राहुल यांच्याकडे मोबाईल आहे. घटनेबाबत दि. ९ ते १२ पर्यंत गावातुन कोणी कळवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर घटना घडेल बाबत रक्तमिश्रीत माती मिळाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर घटना घडले बाबत स्वतंत्र पुरावा मिळाला नाही.

१३. मुद्देमाल जप्त केला त्याच दिवशी मोहरील कडे दिला होता. अमान्य की, त्याबाबत कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुसऱ्या दिवशी मोटारसायकल त्यांच्या मालकांना परत केली. रिमांडपुर्वी झडती पंचनामा ५ मीनीटांत केला. हे म्हणणे खरे आहे की, सा.क्र. ३ राहुल आणि फिर्यादी यांच्यावर अनेक केसेसे आहेत. सा.क्र. २ राहुल तवलवाडी फाट्यावर धाबा चालवतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी राहुल व झुंबर यांचे एक कुटुंब आहे, त्यांचे संगनमत असल्याबाबत सांगु शकत नाही. ते उपोषनासाठी दबाव तंत्राचा वापर करत असले बाबत सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी मध्ये असणाऱ्या वैमनस्याचा स्वतंत्र तपास

केला नाही. गावातील लोकांनी फिर्यादी अवैद्य धंदे करतात या बाबत तक्रार दिल्या बाबत माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, बेशुध्द व्यक्तीला मोटारसायकल वर नेणे शक्य नाही. हे म्हणणे खरे आहे की, सा.क्र. ३ राहुल यांनी केलेले तक्रारी अर्ज आहेत. अमान्य की, मी हनुमंत झगडे, आनंद, सागर जगताप यांचे जबाब नोंदवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दवाखान्यात संगणक सोबत नेला नव्हता.

१४. सा.क्र. १ फिर्यादीने जबाब देताना, त्यांनी व तेथे जमलेल्या लोकांनी त्यांच्या वडीलांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले, मला झालेल्या दुखापती बाबत मी शासकीय रुग्णालय आष्टी व नोबेल हॉस्पीटल नगर येथे उपचार घेतले, याबाबी सांगीतल्या नव्हत्या. सा.क्र. २ राहुल याचा जबाब नोबेल हॉस्पीटलला घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी घटनेच्या दिवशी कोणत्या दिशेने आले याबाबत तपास केला नाही. साक्षीदार राहुल कोणत्या वाहनाने आला याबाबत तपास केला नाही.

१५. सा.क्र. ३ झुंबर याने जबाब देताना, आरोपी क्र. १ ते ४ हे तवलवाडी कडुन आष्टी कडे निघाले होते, त्यांनी पुन्हा शिवीगाळ केली, त्यानंतर सर्व आरोपी यांनी मिळुन आम्हाला गाडीवरुन ओढले, काशीनाथ तुकाराम पोकळे यांनी काठीने मारहाण केली, तसेच दगड उचलुन दगडाने मारहाण केली, मला दगडाने मारल्यानंतर मी बेशुध्द पडलो, शुध्द आल्यानंतर पोलीस जबाब घेण्यासाठी आले होते. याबाबी त्याने सांगीतल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व साक्षीदार झुंबर कोणते मोटारसायकल चालवत होता हे निष्पन्न झाले नाही. अमान्य की, दि. ०९/१०/२०१७ रोजीचे घटना लपवुन फिर्यादीशी संगनमत करुन खोटे दोषारोप दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, डॉक्टरांच्या उपस्थितीत जखमी झुंबर याचा जबाब नोंदवला नाही. अमान्य की, नि. ८६ ते ९१ पोलीस स्टेशनला तयार केले. अमान्य की, खोटा निवेदन व घटनास्थळ पंचनामा केला. अमान्य की, सरतपासात खोटा मजकुर नमुद केला आहे. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक ः २१/०४/२०२६

स्थळ ः आष्टी

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.04.21 17:29:49 +0530

(एम.आर.बडाख)
३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आष्टी.